# प्रकरण २ रे

# व. बा. बोधे : वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

# प्रकरण २ रे

# व. बा. बोधे : वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

## २.१ प्रास्ताविक :

व. बा. बोधे यांच्या 'कोकरउड्या' आणि 'रानपालखी' या आत्मकथनांच्या स्वरूपाचा शोध घेण्यापूर्वी बोधे यांच्या व्यक्ती व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे महत्त्वाचे ठरेल. कारण लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब हे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे त्यांच्या साहित्यकृतीमध्ये उमटत असते. त्यामुळे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्याच्यावर झालेले वाङ्मयीन तसेच सामाजिक संस्कार, भोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक वातावरण यांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. या सर्व घटकांचा त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर किती आणि कसा परिणाम झाला आहे हे पाहणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यातूनच लेखकाची कलाकृती आकाराला येत असते. त्यासाठी प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन त्यांच्या साहित्याचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २.२ बोधे यांचे लौकिक जीवन :

व. बा. बोधे यांचे पूर्ण नाव वसंत बाबासो बोधे. त्यांचा जन्म १ जून १९४९ रोजी सांगली जिल्ह्यातील अंकलखोप या गावी झाला. अंकलखोप येथेच त्यांचे बालपण गेले. वडील बाबासो बोधे हे पोलीस खात्यात नोकरीला होते. त्यांच्या वडिलांचा स्वभाव छांदशी असल्याने बोधेंच्या आईची ससेहोलपट झाली. परंतु तिने स्वत: कष्टाने आपल्या मुलांना वाढविले. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्याच्या कोरेगांव तालुक्यातील दुधी. त्यांच्या वडिलांना वाचनाचा छंद होता. त्यामुळे ते वेगवेगळी मासिके घरी आणत. त्यामुळे बोधे यांनाही वाचनाची सवय लहानपणापासून लागली. वडील सरकारी खात्यात नोकरीला असूनसुद्धा घराची व्यवस्थित काळजी घेत नव्हते. आईने (हौसाबाई) मात्र काबाडकष्ट करून स्वत:च्या मुलांना शिक्षण दिले. वसंत बोधे यांच्या घरची परिस्थिती ही हलाकीची असल्याने ते स्वत: रेल्वेस्टेशनवर फळे विकणे, करंजाच्या झाडाच्या करंज्या गोळा करणे व विकणे असे करून आपला जीवन चरितार्थ सुरुवातीच्या काळात चालविला. कथाकथन करून ते पैसे मिळवत असत. त्याचप्रमाणे दैनिके, मासिके, साप्ताहिक यांतूनही कथालेखन करीत असत. त्यांची पहिली कथा 'फिस्ट' ही प्रसिद्ध झाली आणि बोधे यांच्यातील लेखकाचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू झाला.

बोधे यांनी गावाशेजारील आसपासच्या शाळांमधून कथाकथन करून पैसा मिळवला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या गावामध्ये असणाऱ्या मराठी शाळेमध्ये झाले. त्यांनी शिरंबे या गावी पाचवी ते अकरावी पर्यंतचे शिक्षण घेतले. बोधेंच्या घरची परिस्थिती गरिबीची असल्याने त्यांना शिक्षण घेण्यासाठीही खूप संघर्ष करावा लागला. महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते कराडला गेले. तेथे सुद्धा त्यांच्या राहण्या-खाण्याची समस्या होती. परंतु त्याच्यावर त्यांनी स्वत: मार्ग काढला. कॉलेज करत असताना ते न चुकता वाचनालयात जात. तेथे दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक अशा बऱ्याच प्रकारचे वाचन ते करत असत. एकीकडे वाचनाची व दुसरीकडे वक्तृत्वाची साधना त्यांनी अखंड केली.

एम. ए. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पूर्ण केले. एम. ए. करत असतानासुद्धा त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. तरीसुद्धा शिक्षणाची नाळ त्यांनी तुटू दिली नाही. एम. ए. पूर्ण केले.

१९७७ ला बोधे यांचे पहिले पुस्तक 'फिस्ट' प्रसिद्ध झाले. आज एक ग्रामीण लेखक, कथाकथनकार, मिस्किल विनोदी वक्ता, अभ्यासू प्राध्यापक म्हणून त्यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. त्यांनी सात कथासंग्रह, नव्वद कादंबऱ्या, दोन आत्मकथने, सहा ललितगद्य, एक नाटक, दोन नाटिका इ. साहित्य लिहिले आहे. त्यांचे साहित्य हे ग्रामीण भागातील भटका समाज, बारा बलुतेदार, दलित समाज व विविध जाती-जमातींवर प्रकाश टाकणारे आहे.त्यामुळे ग्रामीण समाज त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित होते.

**व. बा. बोधे यांची ग्रंथसंपदा :**

**२.३ कथासंग्रह :**

व. बा. बोधे यांनी १९७४ च्या दरम्यान कथालेखनास प्रारंभ केला. दारिद्र्यातच त्यांचा जन्म झाल्याने त्यांना दारिद्र्याचे चटके भोगावे लागले. त्यांचा शैक्षणिक प्रवासही दारिद्र्यातच झाला, त्यामुळे स्वत:चे अनुभव व सभोवतालच्या समाजाचे वास्तव चित्रण हाच त्यांच्या कथेचा विषय झाला. त्यांची कथा दारिद्र्याच्या चटक्यांनी होरपळून निघालेली आहे. वेदना टिपीतच ती अवतरली आहे. बोधे यांच्या कथा 'तरुण भारत', 'दैनिक पुढारी', किर्लोस्कर, महाराष्ट्र साहित्य परिषद, साप्ताहिक सकाळ, युवांकुर, दिवाळी अंक इ. विविध वृत्तपत्र, संशोधन पत्रिका, मासिक इ. मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याचबरोबर त्यांच्या कथाकथनांना विविध पारितोषिके प्राप्त आहेत.

व. बा. बोधे स्वत: कथेविषयी म्हणतात, ''मी लहान वयात अनुभवलेल्या, अस्वस्थ करणाऱ्या सातारी बोलीत केलेली कलात्मक मांडणी म्हणजे माझी ग्रामीण कथा.''[१] त्यांच्या कथांतून त्यांनी अनुभवलेले प्रसंग चित्रित केलेले आहेत. त्यांचा प्रत्यय कथा वाचताना येतो. स. शि. भावे त्यांच्या कथेविषयी म्हणतात, ''तपशिलाचा कंटाळा न करता बोलीभाषेत केलेले सरळ निवेदन.''[२] बोधे यांच्या कथेच्या स्वरूपाविषयी अचूक भाष्य भावे यांनी केले आहे. यांच्या कथेची भाषा ही अगदी साधी-सोपी बोलीभाषा आहे. त्यांच्या कथा वाचताना त्याचा प्रत्यय येतो.

बोधे यांचा 'फिस्ट' हा पहिला कथासंग्रह मार्च १९७७ मध्ये प्रकाशित झाला. या कथासंग्रहात पारितोषिक प्राप्त कथांचा समावेश आहे. लेखकाने 'फिस्ट' कथेतून शाळकरी वयातील अनुभव चित्रित केला आहे. शाळेला उशीर होतो तेव्हा शाळा बुडवून सर्व मित्र ओढ्याला खेकडे धरतात. त्याची कडी करतात आणि त्याचवेळी शाळेतील मास्तर मरण पावतात. याचे चित्रण त्यांनी केले आहे. कथेचा शेवटचा भाग काही प्रमाणात काल्पनिक आहे असे वाटते.

मिलेट्रीमध्ये भरती होण्यासाठी गावातील तरुणाने केलेल्या पराकाष्टेच्या प्रयत्नांचे चित्रण 'भर्ती' या कथेतून केले आहे. जन्मदात्या आईला सुखी ठेवण्यासाठी धडपडणारा आणि सैन्यात भर्ती होऊ इच्छिणारा वसंत धूर्त आणि बेजबाबदार अधिकाऱ्याकडून कसा भरडला जातो याचे चित्रण अत्यंत वास्तववादी स्वरूपात या कथेतून आलेले आहे.

तर 'गराडा' ही दलित साहित्यामधील तिसऱ्या पारितोषिकाची कथा असा उल्लेख प्रसिद्ध समीक्षक रा. ग. जाधव यांनी 'निळी पहाट' या ग्रंथात केलेला आहे. 'गराडा' कथा म्हणजे लता नावाच्या मुलीची आत्मकथा आहे. लताचे वडील वारल्याने तिची आई विधवा होते. गावातील पाटलाच्या शेतावरती ती नेहमी कामाला जाते. पाटलाशी असलेले आईचे संबंध लताला पटत नाहीत. लताला चुकवून घराबाहेर पडणे, पाटलाच्या लोकांनी घरी येऊन चौकशी करणे. या सर्व घटना लताला आवडत नाहीत. त्यामुळे लता व तिची आई यांच्यात नेहमी खटके उडतात. कथेच्या शेवटी आई लताला डोळ्यामध्ये पाणी आणून असाहाय्यतेचा सर्व इतिहास सांगते. तिच्या जगण्याभोवती पाटलाचा गराडा पडला आहे. त्या गराड्यातून आईची सुटका जशी होत नाही तशी लताची ही होत नाही. हे एक सामाजिक वास्तव मांडताना ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये सर्वसामान्यांची होत असलेली ससेहोलपट लेखक मांडतो. लेखक मे महिन्याच्या सुट्टीत शेळ्या राखण्यासाठी रानात जातो. त्यावेळी लेखकाच्या शेळ्या पाटलाच्या मळ्यात शिरतात. त्या शेळ्यांना परतवण्यासाठी त्याने दगड भिरकावले. परंतु तो

चुकवून शेळ्या तालीवरून खाली गेल्या. रागाच्या भरात लेखकाने तालीवरून उडी मारली. त्यावेळी खडकावरती टाच आपटते. पाय कायमचा आचकला. त्यामुळे त्यांना अडीच महिने अंथरुणावरती बसावे लागले. त्यावेळी अनेकांनी गावठी उपाय सुचवले. ते केले यावरून लेखकाला 'उपाय' नावाची कथा सुचली. त्यांनी ती कथा आजारी असताना लिहिली. पुढे ती माय मराठी स्पर्धेसाठी पाठवली. ती पुरस्कार विजेती ठरली.

'फिस्ट' या कथासंग्रहातील कथांचे वैशिष्ट्य सांगताना डॉ. द. ता. भोसले म्हणतात, ''त्या अस्सल ग्रामीण कथा वाटतात. अत्यंत वास्तव अनुभवांचे कलात्मक चित्रण या कथांमध्ये पदोपदी जाणवते. ग्रामजीवनाच्या मातीतून वरती येऊन तरारलले अनुभव आपल्या अस्सलतेसह शब्दरूप झाले असल्याने या कथा एका अंगाने वास्तववादी आहेत.''[३] डॉ. द. ता. भोसले यांचे वरील मत योग्य आहे. कारण बोधे यांच्या कथांतून ग्रामीण भागाचे चित्रण आलेले असून त्यांच्या कथांतून अस्सल ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडताना दिसते. 'फिस्ट' या कथेची भाषा ग्रामीण बोलीभाषा आहे. तिच्यात येणाऱ्या पात्रांची भाषा ही गावरान बोलीभाषा आहे. त्यामुळे या कथासंग्रहातील कथा परिणामकारक वाटतात. 'फिस्ट'च्या भाषेविषयी डॉ. द. ता. भोसले म्हणतात, ''खेड्यातील माणसाच्या बोलीतूनच या कथातील प्रसंग साकार झालेले आहेत. भाषेचा बाज सहज, सुंदर, प्रसंगोचित, स्वाभाविक व ठसकेबाज वाटतो. बोलीमुळे कथेचे सौंदर्य द्विगुणित होते.''[४] या कथासंग्रहातील येणारा समाज, परिसर हा खेड्यातील असल्याने त्यांच्या तोंडची बोलीभाषा असल्याने भाषेचा बाज सहज, सुंदर व ठसकेबाज आहे. त्यामुळे कथेचे सौंदर्य ठरते.

'फिस्ट' या कथासंग्रहातील सर्वच कथा मनाला चटका लावणाऱ्या आहेत. त्यामध्ये खेड्यातील जनजीवन आले आहे. 'फिस्ट' या कथासंग्रहाबाबत डॉ. सदा कऱ्हाडे असे म्हणतात, ''फिस्ट हा कथासंग्रह लक्षात राहण्यासारखा आहे. साताऱ्यातील खेडूत जीवन, सातारी बोली हे अतिशय प्रत्ययकारी भाषेत ते रंगवतात.''[५] डॉ. सदा कऱ्हाडे यांचे मत सार्थ वाटते. त्यांच्यावर खेड्याचा प्रभाव दिसतो. त्यामुळे त्यांना आलेले खेड्यातील अनुभव त्यांनी वास्तवदर्शी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. व. बा. बोधे यांच्या कथा या आटोपशीर आहेत. अवास्तव प्रसंगांची, घटनांची गर्दी नाही. साध्या भाषेत ती साकारली आहे.

कथेच्या बाबतीत डॉ. आनंद यादव म्हणतात, ''ग्रामीण भाषेचा सहज आविष्कार तिला लाभला आहे. त्यामुळे तिची शैली, सरणी ग्रामीणच राहिली आहे. एखादे ग्रामीण मनच इथ व्यक्त

होत आहे, असे प्रत्येक वेळी वाटते. 'नागर मनाचा', 'शिकलेला' परिणाम या कथेवर होत नाही. त्यामुळे कथा शुद्ध राहिली आहे.''[६] डॉ. आनंद यादवांचे विचार बोधे यांच्या कथेचे अचूक मूल्यमापन करताना दिसतात. कारण बोधे यांच्या कथेतील भाषा ही ग्रामीण भाषा आहे. तिची शैली व सरणी ग्रामीण राहिल्यामुळे एखादे ग्रामीण मन कथेत व्यक्त होताना जाणवते. म्हणून डॉ. आनंद यादवांचे मत योग्य वाटते.

ग्रामीण संस्कृतीचा, रूढी परंपरांचा प्रभाव, त्यांना आलेले अनुभव, बोधे यांनी कथेतून, तसेच कादंबरीतूनही मांडले आहेत. एकूणच ग्रामीण जीवन त्यांनी स्वत: भोगले असल्याने तेच साहित्यात त्यांनी चित्रित केले. प्रभा रांगणेकर एका ठिकाणी म्हणतात, ''बोधे हे फॅशनेबल ग्रामीण कथालेखक नसून ग्रामीण जीवन हाडीमासी मुरलेले ग्रामीण कथाकार आहेत.''[७] प्रभा रांगणेकर यांचे मत योग्य आहे कारण बोधे यांना बालवयात आलेले सर्व कडू-गोड अनुभव त्यांनी स्वत: अनुभवले तेच त्यांनी कथेतून प्रांजळपणे मांडलेले आहेत.

बोधे यांच्या कथेच्या रचनेबाबत डॉ. आनंद यादव एके ठिकाणी म्हणतात, ''बोधे यांची कथा आत्मनिष्ट आणि 'मी' ला आलेल्या अनुभवांशी प्रामाणिक राहिल्याने शुद्धता प्राप्त झाली आहे. त्यामुळे ग्रामीण कथेतील सांकेतिक अनुभव, ठरावीक आरंभ - मध्य - शेवट - कलाटणी - निसर्गवर्णने इ. नेहमीचा प्रकार येथे आढळत नाही.''[८] बोधे यांनी आपली कथा आत्मनिष्ठ ठेवली आहे. 'स्व' ला आलेल्या अनुभवांशी त्यांची कथा प्रामाणिक असल्याने कथेला शुद्धता प्राप्त झाली. ग्रामीण कथेत येणारी निसर्गवर्णने, सांकेतिक अनुभव त्याचबरोबर इतर कथांत जसा आरंभ मध्य शेवट कलाटणी अशा नेहमीचा साचा नसून बोध्यांची कथा या पेक्षा वेगळ्या पद्धतीने अवतरते.

व. बा. बोधे यांच्या 'फिस्ट' या कथेतील वातावरणाच्या संदर्भात दीपक घारे म्हणतात, '' 'फीस्ट' मधील वातावरण खेड्यातल्या मुलांसारखे निर्मळ आहे. मुलांच्या आयुष्यात येणारे कडू गोड प्रसंग चित्रित करताना बालमनाची सूक्ष्म जाण बोधे यांनी दाखविली आहे.''[९] दीपक घारे यांचे मत रास्त वाटते कारण बोधे यांनी बालवयात मित्रांच्या सोबत त्यांनी खूप अनुभव घेतले. त्यांच्या मनातील भाव-भावना त्यांनी सूक्ष्म रीतीने कथेत टिपल्या आहेत. त्याची त्यांना पूर्ण जाण असल्याने 'फीस्ट'मधील वातावरण हे खरेच खेड्यातील मुलांप्रमाणे निर्मळ आहे.

ह्या संग्रहातील 'भर्ती' या कथेला मात्र कारुण्याची किनार, खेडूतांचा भाबडेपणा, गैरफायदा घेणारी माणसे समाजामध्ये कशी असतात याचे चित्रण लेखकाने सहृदयतेने केले आहे. संग्रहातील

इतर कथा उदा. 'उपाय', 'हात', 'वचन' या ठरावीक साच्याच्या वाटतात. नेहमीच्याच कथाविषयांना ग्रामीण स्वरूप देण्यापलीकडे या कथांत नवीन असे काहीच नाही.

'फीस्ट' या कथासंग्रहाबद्दल विलास जाधव एके ठिकाणी असे म्हणतात, "ग्रामीण जीवनातील सुख-दु:खे चित्रित करणारे जे मातब्बर ग्रामीण लेखक आहेत, त्यांच्या पंगतीत आपली फीस्ट घेऊन प्रा. व. बा. बोधे हे अगदी नव्यानेच सामील झाले आहेत."[१०] विलास जाधव यांचे विचार योग्य आहेत. कारण बोधे हे इतर मातब्बर लेखकांत नवीन असले तरी त्यांच्या फीस्ट या कथासंग्रहाने ते त्या लेखकांच्या पंगतीत सामील होऊ शकले.

'फीस्ट' या कथासंग्रहाच्या बाबतीत विलास जाधव म्हणतात, "फीस्ट हा कथासंग्रहच मुळी प्रथमपासूनच मनाची 'तगमग' वाढवत जाणारा आहे. ग्रामीण परिसरात वावरणाऱ्या हर एकाची सुखदु:खे, विशेषत: उपेक्षितांच्या वेदना, आक्रोश, त्यांच्या वाट्यास आलेली दारुण आयुष्याची 'चकार' आजही 'कर्र ऽ ऽ कर्र ऽ ऽ' करत थरथरताना अनुभवाला येते. आपल्या शब्दसामर्थ्याने त्या जाणिवांना स्पर्श करण्याचा प्रयत्न लेखकाने प्रस्तुत कथासंग्रहात केला आहे."[११] विलास जाधव यांचे हे मत खरे अचूक आहे. कारण, बोधे यांच्या कथा वाचताना वाचकांच्या मनाची तगमग झाल्यावाचून राहत नाही. ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे सुखदु:ख विशेषत: उपेक्षितांच्या वेदना त्यांनी कथेतून मांडल्या आहेत. त्यामुळे काही कथा या दु:खाने भरलेल्या आहेत.

फीस्ट या कथासंग्रहातील कथांच्या संदर्भात विलास जाधव म्हणतात, "ग्रामीण परिसरात वर्षानुवर्षे दलित राहिलेल्या समाजाचे चित्र बोधे यांनी आपल्या या कथासंग्रहात अधिक विस्तृत व सखोलपणे रेखाटले आहे. अनुभवांचे जिवंत स्पंदन प्रत्येक कथेत प्रत्ययास येते. नाटकीपणा नाही. नावीन्याचा भलता सलता सोस नाही. सारे कसे अगदी समोर घडत चालल्यासारखे. प्रसंगाचे व घटनांचे, व्यक्तींचे व प्रकृतीचे अचूक चित्रण करणारे."[१२] विलास जाधव यांचे मत योग्य वाटते कारण ग्रामीण भागात असलेल्या दलित भटक्या समाजाचे चित्रण बोधे यांनी अधिक सखोल व विस्तृतपणे केले आहे. त्याच्यात जिवंत स्पंदने आढळतात. कुठेही नाटकीपणा जाणवत नाही.

फीस्टमधील प्रत्येक कथा अशी स्वतंत्र परिमाण घेऊन घडत गेलेली असल्यानेच ती वाचकांच्या मनाचा तळापासून ठाव घेते. फीस्टमध्ये डोळ्यांचे काठ ओले करणाऱ्या 'भर्ती', 'रानवा' यांसारख्या कथा जशा आहेत, तशाच ओठावर हासू पेरणाऱ्या 'कोंबडी', 'चकार', 'दुपार' या विनोदाचा वर्ख लाभलेल्या कथाही आहेत.

'फीस्ट' या कथासंग्रहातील अनेक कथा या पुरस्कार प्राप्त आहेत. 'भर्ती' या कथेला 'तरुण भारत' वासंतिक कथास्पर्धा पुरस्कार १९७४, १९७४, १९७७ सलग तीनवेळा (प्रथम) किर्लोस्कर मासिकाच्या उदयाचे कथाकार आहेत. 'भर्ती' कथेसाठी प्रथम पुरस्कार प्रदान १९७४.

'गराडा' कथेस 'अस्मितादर्शक' नियतकालिकातर्फे आण्णा भाऊ साठे पुरस्कार १९७६ तसेच 'रानवा' कथेस सहकारी विश्व कथा स्पर्धा १९७६ प्रथम पुरस्कार त्याचबरोबर मायमराठी, नवी दिल्ली या नियतकालिकाचा 'उपाय' कथेस द्वितीय पुरस्कार प्राप्त. अशा प्रकारे फीस्ट या कथा संग्रहातील कथांच्या संदर्भात अनेक समीक्षकांनी आपली मते मांडली आहेत.

व. बा. बोधे यांचा 'तिगाड' हा कथासंग्रह १९९७ मध्ये प्रकाशित झाला. या कथासंग्रहात फक्त सहा कथा आहेत. त्यामध्ये 'बेनवाड', 'हुलकावणी' या दोन दीर्घ कथा आहेत. 'बेनवाड' ही संपत्तीची अधिक हाव असलेल्या लोकांची कथा. हे बेनवाड लोक कशी फसवणूक करतात याचे चित्रण या कथेत केले आहे. 'हुलकावणी', 'तिगाड', 'बदला', 'सापळा' या कथांचा समावेश या कथासंग्रहात येतो. ग्रामीण जीवनामध्ये व्यक्तीची समाजात फसवणूक कशाप्रकारे होते. त्याचबरोबर त्याची कशी कोंडी केली जाते याचे चित्रण 'तिगाड' या कथासंग्रहातून येते.

'भटकीची मेक' हा कथासंग्रह १९९७ मध्ये चंद्रमोळी प्रकाशनने प्रकाशित केला असून या कथा संग्रहाचे स्वरूप विनोदी आहे. यामध्ये अकरा कथांचा समावेश आहे.

'दस्त' या कथेमध्ये ग्रामीण भागातील माणसाचे शेतीवरती अपार प्रेम असते. जमीन खरेदी करण्यासाठी कणसे नावाची व्यक्ती प्रयत्नांची पराकाष्ठा करत असते. कणसेची छोटी बहीण लग्नाला आलेली असून सुद्धा लग्न करायचे सोडून व घरात पैसा नसतानासुद्धा जमीन घेण्यासाठी धडपडत असतो. त्याच्या मते लग्न आज ना उद्या होईल. परंतु शेती मात्र पुन्हा मिळणार नाही. त्यामुळे गावातील रिटायर्ड कॅप्टन बाजीराव पाटील यांच्याकडून दहा हजार रुपये बहिणीच्या लग्नासाठी उसने म्हणून घेतो व स्वत:चे दहा हजार रुपये असे वीस हजार रुपये जमवून चंदरच्या शेतीचा सौदा करतो. गावातील राजकारणाने त्याला जमीन मिळत नाही. खूप त्रास होतो. या कथेतून ग्रामीण भागातील लोकांचे राजकारण, शेतीवरील प्रेम, त्याचबरोबर गावातील भानगडी यांचे चित्रण 'दस्त' या कथेतून चित्रित केले आहे.

'भटजीची मेक' ही कथा या कथासंग्रहातील विशेष महत्त्वाची कथा आहे. ही नाना भटजी नावाच्या एका गुरवाची कथा आहे. गावातील लोकांना जास्तीत जास्त कसे लुबाडता येईल याच विचारात तो असतो.

गावच्या पाटलाच्या मुलीच्या लग्नात भटजीला दोनशे रुपये अथवा पोशाख असा व्यवहार ठरलेला असतो. परंतु लग्नाचा विधी झाल्यावर पाटलाने भटजीला फक्त पंचवीस रुपये दिली. भटजीला राग येतो. पाटलाचा कसा सूड घ्यायचा याचा विचार त्याच्या डोक्यात येतो आणि अशाच एका संधीचा उपयोग करून पाटलाला धडा शिकवतो. त्याचा आढावा या कथासंग्रहातून घेतला आहे.

'गूळ' ही कथा शेतकऱ्याच्या जीवनावर आधारित आहे. शिवाजी हा कुटुंबप्रमुख आहे. किराणा दुकानाची उधारी, बेंदराच्या सणासाठी लागणारा खर्च, घरातील किरकोळ खर्च, मुलांना कपडेलत्ता, वह्यापुस्तके या सर्वांची पूर्तता करण्यासाठी 'गूळ' विक्रीसाठी घेऊन बैलगाडीने बाजाराच्या दिशेने जाताना गावातील धनगर वस्तीवरील बायका शिवाजीला गाडीतून नेण्यास विनंती करतात. नाइलाजास्तव शिवाजीला त्यांना गाडीत घ्यावे लागते. त्या बायकांच्या बसण्याने गुळाच्या ढेपी सपाट होतात; त्यामुळे शिवाजीला पाचशे रुपयाचा माल तीनशे रुपये भावाने विकावा लागतो. थोडक्यात माणुसकीमुळे शिवाजीला हा तोटा सहन करावा लागला. शिवाजीसारखी माणुसकी केवळ ग्रामीण भागातच आजही टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचप्रमाणे दिंडी, धुव्वा, मेजर, दस्ता या कथांमधून ग्रामीण माणसांच्या माणुसकीचे चित्रण आले आहे.

'जत्रा' हा व. बा. बोधे यांचा तिसरा विनोदी कथासंग्रह. अस्सल ग्रामीण विनोदी कथासंग्रह १९० पृष्ठांचा असून यातील कथा कल्पना, जत्रा, स्वप्ना, वर्षारंभ, आक्रोश, आजची दवंडी, अजब, राजहंस, कटकट अशा वेगवेगळ्या दिवाळी अंकांतून प्रकाशित झालेल्या आहेत.

'जत्रा' ही कथा कल्पना दिवाळी अंक १९९३ मधून प्रसिद्ध झाली आहे. ग्रामीण भागात जत्रा म्हणजे सर्व लोकांचा आनंदाचा सण असतो. त्या जत्रेचे चित्रण या कथेतून चित्रित केले आहे. या कथेचा नायक हाणमा व कथेची नायिका त्याची पत्नी कमला आहे. गावची जत्रा तोंडावर आल्यामुळे हाणमा घरासमोरील पारस, रानातील बाभळी त्याचबरोबर शेतातील घेवडे, चवळी विकून यात्रेसाठी पैसा उभा करतो. घरात बाजार भरतो. घरातील लोकांना नवीन कपडे आणतो. गावच्या यात्रेत तमाशाला महत्त्व असते. त्या तमाशाकडे हाणमाचे लक्ष वेधून राहिले. गावामध्ये सायंकाळी देवाची पालखी निघालेली असते. त्या पालखीत हाणमा सामील होतो. गुलालाने रंगतो. देवाची पालखी देवळात पोचवून तो घरी येतो. त्यावेळी त्याची पत्नी त्याला ओवाळते. जेवण करून हाणमा झोपी जातो. झोपेतून हाणमा उठतो व पटका म्हणून पत्नीची साडी डोक्याला गुंडाळून तमाशाच्या फडात जातो. त्यावेळी सर्व माणसे त्याच्याकडे पाहतात व हशा निर्माण होतो. अशाप्रकारे विनोद निर्मिती केली आहे. एकूण ग्रामीण भागातील जत्रांचे चित्रण योग्यरीत्या केले आहे.

## २.४ कादंबरी :

व. बा. बोधे यांची १९७७ ला कादंबरी लेखनाला सुरुवात झाली. बोधे यांच्या व्यक्तिमत्त्वावर, मनावर ग्रामीण जीवनाचा ठसा उमटला. जे अनुभवले तेच त्यांनी साहित्यातून मांडले. लहानपणापासून बोधे यांनी अनेक जाती-जमातींच्या लोकांचे जीवन स्वत: अनुभवले होते. त्या लोकांचे जीवन त्यांनी साहित्यातून रेखाटले आणि तोच त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू ठरला. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांतून अनेक जाती/जातींचे चित्रण आले आहे. तसे पाहता त्यांच्या कादंबरीची संख्या आजपर्यंत नव्वदच्या आसपास आहे. डॉ. यशवंत पाटणे बोधे यांच्या लेखनाविषयी म्हणतात, ''लेखक म्हणून बोधे यांचा लेखनप्रवास दांडगा आहे. कादंबरीलेखनात त्यांनी स्वत:चा एक वाचकवर्ग निर्माण केला.''[१३] डॉ. यशवंत पाटणे यांचे मत योग्य वाटते. कारण बोधे यांचा लेखनप्रवास खूप मोठा आहे. आजही त्यांचा हात लिहिता आहे.

१९७८ ला 'जंगल' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध समीक्षक रा. ग. जाधव यांच्या अभिप्रायासह प्रकाशित झाली. या कादंबरीने लेखकाच्या आयुष्यात मोठे वादळ निर्माण झाले. कादंबरी प्रकाशित होण्याआधी ती 'जत्रा' या साप्ताहिकातून प्रकाशित होत होती. 'जंगल' या कादंबरीतून दलित वस्तीतील लोकांवर उच्चवर्णीय लोकांनी केलेल्या अन्यायाचे चित्रण केले आहे. दलित वस्तीतील मुलीवरती गावातील उच्चवर्णीय घरातील मुलांनी अन्याय केला. त्याला वाचा फोडण्यासाठी लेखकाने 'जंगल' चे लेखन केले. परंतु दलितांनी लेखकाच्या बाजूने उभे न राहता आमची अब्रु वेशीवर टांगली. अशी लेखकावर आरोपांची झोड उठविली होती.

'जंगल' या कादंबरीवरती मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. या कादंबरीत स्त्रियांबद्दल ओंगळ लेखन असे अनेक आरोप झाले.

'जंगल' या कादंबरीबाबत दया पवार आपल्या १७ ऑक्टोबरच्या १९७८ च्या पत्रात म्हणतात, ''आपली 'जंगल' ही कादंबरी वाचली. आपली गावरान शैली खूपच आवडली. आपल्या नागरी संस्कृतीचा अस्सल बाज विसरला नाही हे महत्त्वाचे वाटले. गावगाड्यातील सरंजामशाहीतला जंगलीपणा आपण अचूक पकडला आहे. मात्र याचे चित्रण करताना केवळ सेक्सवर जो भर दिलात त्यामुळे कादंबरी एकारलेली वाटली. गावगाड्यातील विविध दडपलेल्या समूहांतील होणारे विविध शोषण जर आपण व्यक्त केले असते तर 'जंगल' या कादंबरीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले असते.''[१४] दया पवारांनी 'जंगल' कादंबरीबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांच्या मते सेक्सवरती भर दिल्याने कादंबरी एकारली आहे.

'जंगल' या कादंबरीबद्दल प्रा. केशव मेश्राम म्हणतात, "अत्यंत वास्तवदर्शी आणि अंतर्मुख करणारे लेखन आपण केले आहे. सर्व जीवनाचा बाजार करणाऱ्या सवर्णांचे व त्यात सर्वस्व गमावण्याच्या भीतीनं जीवाच्या आशेने लाचार होऊन सरपटणाऱ्या दलितांचे वेधक चित्रण तुम्ही केले आहे. दोन भुकांनी वखवखलेल्या माणसांचा हा देश. त्याचे ग्रामीण पातळीवरील हे शब्दांकन. काही जागा कच्च्या आहेत. नाहीतर ही कलाकृती नुसती चांगली नव्हे तर मोठी ही उतरली असती."[१५] अशाप्रकारे 'जंगल' या कादंबरीची समीक्षकांनी दखल घेतली.

बोधे यांची 'कातन' ही कादंबरी १९९६ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीतून कैकाडी समाजाचे, त्यांच्या रूढी-परंपरांचे, देवदेवतांचे यथार्थ चित्रण बोधे यांनी केले आहे. 'कातण' या कादंबरीच्या भाषाशैलीचा बाज ग्रामीण आहे. कैकाडी समाजातील लोकांची बोलीभाषा असल्याने कादंबरीला एक वेगळा साज आलेला दिसतो. स्वत: लेखकाने त्या समाजातील लोकांचे जीवन जवळून पाहिलेले आहे. तेच त्यांनी चित्रित केले आहे. 'कातन' या कादंबरीचा नायक शिवाजी आहे. त्याचा मोठा भाऊ मृत्यू पावल्याने त्याच्या घरात मोठी वहिनी, आई, शिवा व त्याची पत्नी या चार माणसांचे कुटुंब आहे. त्याच्यावर या कादंबरीचे कथानक आहे.

'हिरव सोनं' ही कादंबरी सप्टेंबर १९९३ मध्ये प्रसिद्ध झाली. या कादंबरीची पृष्ठसंख्या २२२ आहे. 'हिरव सोनं' ही कादंबरी वसंत या नायकाच्या ग्रामविकासाची स्वप्ने छातीत घेऊन वावरणाऱ्या एका उमद्या मनाची अस्वस्था करणारी गळचेपी कशी झाली आहे, याचे वर्णन या कादंबरीमध्ये आले आहे. कादंबरीची भाषा शैली सातारी आहे."[१६]

वसंत हा या कादंबरीचा नायक असून सोसायटीचा चेअरमन हणमंतराव, बाजी नरसाळा, सखाराम, दत्ता फदरा, मुक्ता चव्हाण, नाना फडतरे, दादा पाटील अशी पात्रे प्रस्तुत कादंबरीत आहेत). कादंबरीचा नायक हा सुशिक्षित आहे. त्याच्या मनात गावाबद्दल, समाजाबद्दल आपुलकी आहे. त्यांच्या उन्नतीसाठी झटण्याची इच्छा आहे. गावातील मारुतीच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण करताना वसंताला असंख्य प्रसंगांना तोंड द्यावे लागते. तरीसुद्धा तो मंदिराचे काम पूर्ण करतो. वाचनालय सुरू करताना सुद्धा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

धरणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींना बारा महिने मुबलक पाणी मिळाल्याने शेती बागायती बनली. त्यामुळे गावातील लोकांचा शेतीकडे ओढा वाढला. मुले सुद्धा शिक्षण सोडून बागायतदार बनू लागली. सर्वत्र उसाची शेती पिकू लागली. पैसा मुबलक मिळू लागला. त्यामुळे व्यक्तींची स्वार्थी

व भ्रष्टाचारी वृत्ती वाढली. ग्रामीण परिसरामध्ये धरणाचे पाणी पाटाद्वारे शेतीला मिळू लागल्यामुळे हिरवं सोनं पिकू लागले. पैसा मिळाल्यानंतर माणसे कशी बिघडतात, गावाची सुधारणा करणाऱ्या वसंताला (नायक) कशा प्रकारे विरोध करतात याचे वास्तव चित्रण या कादंबरीतून चित्रित केले आहे.

'भंगराल' ही कादंबरी अमोल प्रकाशन यांनी प्रकाशित केली आहे. या कादंबरीतून ग्रामीण भागातील लोकांचे जीवन चित्रित केले आहे. दैनंदिन जीवनामध्ये समाजात वावरत असताना या कादंबरीचा नायक शंकर याला कोणकोणत्या संकटांचा सामना करावा लागतो याचे परिणामकारक चित्रण या कादंबरीतून केले आहे.

शंकर हा या कादंबरीचा नायक स्वभावाने शांत आहे. परंतु त्याची पत्नी विचित्र असते. पत्नीसाठी त्याने जातीने मराठा असूनही चप्पल दुकान, सायकलचे दुकान सुरू केले. परंतु समाजातील लोकांनी त्याची निंदा केली. शेवटी त्याच्यावरती वाईट दिवस येतात. त्याची अवस्था एखाद्या भंगारवाल्यासारखी होते. म्हणून या कादंबरीचे नाव 'भंगराल' असे आहे.

'गुबूगुबू' १९९५ च्या फेब्रुवारीमध्ये प्रकाशित झाली. प्रस्तुत कादंबरीत गावागावांत धान्य मागून आपले पोट भरणाऱ्या 'नंदीवाला' ह्या भटक्या समाजाचे चित्रण केले आहे. नंदीवाला समाज सतत फिरत असल्याने प्रत्येक गावात त्यांचे थोडेफार दिवस वास्तव्य होते. यात नंदीवाला समाजाच्या विविध घटना प्रसंगांचे सूक्ष्म चित्रण आले आहे. कादंबरीत सातारी बोली भाषेचा समर्थ आविष्कार झाला आहे. ग्रामीण भागात या समाजाला धनधान्य दिले जाते. या समाजात नंदीबैलाला महत्त्वाचे स्थान असते. एकूणच नंदीवाला समाजाचे सणवार, रीतिरिवाज, दैवदैवते यांचे चित्रण या कादंबरीतून झाले आहे.

'रानमैना' ही कादंबरी १९९५ साली प्रकाशित झालेली आणखी एक कादंबरी. ही कादंबरी ग्रामीण संस्कृतीमधील गारुडी जमातीमधील 'शालन' या व्यक्तीभोवती केंद्रभूत झालेली आहे. शालन ही शांत, प्रेमळ मनाची आहे. ती दिसायला शेंद्री रंगाची असल्याने ती साप धरणे, विंचवाची माळ करणे असे उद्योग करते. या कादंबरीचे शीर्षकसुद्धा आशयाला अनुरूप आहे. या कादंबरीची भाषा अत्यंत ग्रामीण व शिवराळ आहे. ग्रामीण भागातील वर्णने तिच्यामध्ये आलेली आहेत. एकूणच ही कादंबरी वाचकांना फक्त दोन घडी विरंगुळा देते.

'मम्मादेवी' हे विटमाळी नंदीवाला समाजाचे कुलदैवत आहे आणि देवीचा भक्त बापू याची देवीवर अफाट श्रद्धा आहे. भगवान शंकर हे नंदीवाला समाजाचे आराध्य दैवत. उदरनिर्वाहाच्या

साधनांपैकी एक साधन म्हणून नंदीचा उपयोग नंदीवाला समाज करून घेत असतो. कोणत्याही गावामध्ये उतरले की गावातील मोकळ्या जागेत पाल लावून नंदीला सजवले जाते. प्रथम मांगवाडा, महारवाडा, कुणबीवाडा असा एक एक दिवस त्या त्या गल्लीमध्ये फिरत असतात. प्रत्येक घरासमोर बापू जायचा, उभा रहायचा. नंदीपासून काही अंतरावर दुसरा ढोलगेवाला त्या घरातील व्यक्तीच्या नावाने जयजयकार करायचा. नंदीच्या वर्ताने घराला आशीर्वाद द्यायचा. नंदीसुद्धा मान हलवून होकार देत.

नंदीवाला समाजात नंदीबैलाला अनन्यसाधारण असे महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्याही समाजात जत्रेला महत्त्वाचे स्थान असते आणि वर्षातून तो एक दिवस येत असतो. अशाच प्रकारचा दिवस नंदीवाला समाजात साजरा होत असतो. त्याच्या देवासाठी डुकराचा बळी दिला जातो. मम्मादेवी हे त्यांचे कुलदैवत, नवस करणे, नवस फेडणे असे विविध प्रकारचे कार्यक्रम जत्रेमध्ये चालत असतात.

बापू आणि देवकीच्या लग्नाला समाजाचा विरोध असल्याने त्यांनी पारंपरिक व्यवस्थेचा त्याग करून नवीन मार्गाचा स्वीकार केलेला असतो. तरीसुद्धा एके दिवशी इंदापूरच्या पेठेमध्ये 'गुबूगुबू' आवाज येतो. त्यावेळी बापू व देवकीच्या डोळ्यात पाणी येते. कारण, नवीन समाजामध्ये प्रवेश केल्यानंतर तो समाज त्यांना स्वीकारत नाही. त्याचबरोबर बालपणी त्यांच्यावर संस्कार झालेले असतात हे कधीही पुसले जाऊ शकत नाहीत म्हणून त्यांच्या डोळ्यांत पाणी येते.

बोधे यांच्या एकूण कादंबरी लेखनाचा विचार करता त्यांच्या कादंबरीचा एक ठरलेला साचा जाणवतो. त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्यातून खून, मारामाऱ्या, बलात्कार, सूड यांसारखे प्रसंग येतात. त्याच त्या घटना त्यांच्या कादंबरीत येतात. त्यांच्या कादंबरीच्या बद्दल डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, "बोधे केवळ घटनांवर लक्ष केंद्रित करतात. त्यामुळे कादंबरीला घटनांच्या मालिकेचे स्वरूप येते."[१६] डॉ. रवींद्र ठाकूरांचे मत योग्यच वाटते. बोधे यांच्या सर्वच कादंबरीतून घटनांची, प्रसंगांची नुसतीच मालिका असते. बरेच प्रसंग, घटना यांच्यात साम्य व तोचतोचपणा जाणवतो. त्यामुळे त्यांच्या कादंबरीची गुणवत्ता दिसून येत नसावी.

बोधे यांच्या कादंबरीच्या स्वरूपाविषयी डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, "शृंगार, खाणेपिणे आणि मारझोड यांशिवाय कुठली ही वर्णन येथे सापडत नाहीत. रंजनाच्या उद्देशाने स्खलनशील माणसांच्या कथा रंगविणे हेच बोधेंच्या कादंबऱ्यांचे स्वरूप आहे."[१७] बोधे यांच्या काही कादंबऱ्यांचा विचार करता डॉ. रवींद्र ठाकूरांचे मत सार्थ आहे. कारण त्यांच्या काही कादंबऱ्यांतून जाणवते. उदा. बिजली (१९८३) ही आकाराम घोरपडे आणि त्यांची सून बिजली यांची व्यभिचारकथा आहे. बिजली

मिळावी म्हणून तो तिचं लग्न त्यांच्या भावाचा वेडपट मुलगा संपा याच्याशी लावून देतो. जनामनाची लाज न बाळगता बिजली आणि आकाराम भोगविलासात रंगून जातात. आकारामच्या मुलाला हा प्रकार सहन होत नाही म्हणून ते त्याचा खून करवितात. अशा प्रकारच्या घटना व प्रसंग यांची रेलचेल बोधे यांच्या कादंबरीतून येते.

बोधे यांच्या कादंबरीच्या भाषेच्या संदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, ''बोध्यांची भाषा ग्रामीण बोलीची ताकद पचविलेली खास गावरान आहे. परंतु नेमक्या निवेदनाऐवजी परखड होत गेलेल्या संवादाचा अतिवापर यामुळे तिची परिणामकारकता उणावते.''[१८] बोधे यांच्या कादंबरीच्या भाषेच्या संदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर यांचे म्हणणे योग्य आहे. कारण बोधे यांची भाषा जरी ग्रामीण गावरान असली तरी नेमक्या निवेदनाच्या अभावाने त्याचबरोबर कादंबरीत संवादांचा अतिवापर असल्याने कादंबरी परिणामकारक वाटत नाही.

एकूणच बोधे यांच्या कादंबरीत नेमक्या निवेदनाचा अभाव आहे. त्यामुळे बोध्यांची कादंबरी ही उच्च प्रतीची वाटत नाही. संवादांचा वापर जास्त प्रमाणात असल्याने कादंबरीची परिणामकारकता दुबळी वाटते.

बोधे यांना मोठ्या प्रमाणात अनुभव आहे. त्यांनी त्यांच्या जीवनप्रवासात आलेले सर्व अनुभव साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कादंबरीतील काही प्रसंग, घटना, पात्रे यांना बोध्यांनी जवळून पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाचा तो विषय झाला आहे.

बोधे यांच्या अनुभवांच्या संदर्भात एके ठिकाणी डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, ''बोध्यांजवळ अनुभवाचे भंडार आहे. परंतु रंजनवादी प्रवृत्तीत वाहत गेल्याने त्यांच्या कादंबऱ्यांची गुणवत्ता मारली गेली आहे.''[१९] डॉ. रवींद्र ठाकूरांच्या मताचा विचार करता त्यांचे म्हणणे रास्त वाटते. बोधे यांच्या अनुभवाच्या कक्षा जरी मोठ्या असल्या तरी रंजनवादी प्रवृत्तीत त्यांची कादंबरी पूर्ण वाहत गेली. त्यामळे त्यांची कादंबरी ही गुणवत्तेच्या दृष्टीने कमी आहे. बोधे यांच्या कादंबरींची संख्या जरी शंभरच्या घरात असली तरी त्याची गुणवत्ता ही सुमार दर्जाचीच आहे असे म्हणावे लागेल.

व. बा. बोधे यांनी भरपूर रंजक कादंबऱ्या लिहिल्यामुळे ते आज लोकप्रिय कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. आज त्यांच्या नावावर शंभरच्या घरात कादंबऱ्या आहेत. आजही त्यांचा हात साहित्यनिर्मितीत गुंतून आहे. रोमॅन्टिसिझमबद्दल त्यांची मते खोल नाहीत. ती भलतीच कामचलाऊ आहे. त्यामुळेच डॉ. आनंद यादव यांनी ग. ल. ठोकळ यांना जैसे ग्रामीण कथा साहित्याचे ना. सी.

फडके म्हटले. त्या चालीवर मराठी ग्रामीण साहित्याचे चंद्रकांत काकोडकर म्हणावे लागेल.''[२०] असे अरविंद वामन कुलकर्णी यांनी बोधे यांच्याबद्दल विधान 'व. बा. बोधे यांच्या कादंबऱ्या : एक अनावृत्ती पत्र' यामध्ये म्हटले आहे.

बोधे यांच्या लेखनाच्या संदर्भात अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, ''तुमच्या लेखनात एक प्रकारची झिंग आहे हे खरे. पण तुमच्या लेखनाचा इतक्यातच एक साचा झाल्यासारखा झालेला आहे, असे मला जाणवते.''[२१] वरील मताचा विचार करता बोधे यांच्या कादंबरीचा एक ठरावीक साचा आहे. त्याच साच्यातून त्यांनी कादंबरी लिहिल्या. त्यात एकप्रकारची झिंग जाणवते.

बोधे यांच्या कादंबरींचा विचार करताना प्रामुख्याने असे म्हणता येईल, की बोधे यांच्या कादंबरीची भाषाशैली ग्रामीण सातारी बोलीभाषा आहे. लेखकाचे बालपण व त्यांची एकूणच जडणघडण सातारा, सांगली, कराड, कोरेगाव या भागांत झाल्याने त्यांच्या कादंबरीतील भाषा ही त्यांच्या भागातील बोलीभाषा येते. त्यांच्या एकूणच कादंबरींतून त्याभागातील निसर्ग नदीचा परिसर नदीकाठाला पाले ठोकून राहणारा भटका समाज यांचे चित्रण त्यांच्या काही कादंबरीतून येते.

लेखक बोधे यांनी ग्रामीण भागातील जनजीवनाचे परिणामकारक चित्रण एकूण साहित्यातून चित्रित केले आहे. त्यांच्या बऱ्याच कादंबरींतून भटक्या विमुक्त जमातीच्या देवदेवतांची वर्णन, त्याचबरोबर त्यांच्या संस्कृतीचे चित्रण आले आहे. बोधे यांनी अनेक भटक्या जातींचे जीवन जवळून अनुभवले होते. बोधे यांच्या गावाशेजारी अनेक भटकी लोक गावात येत त्यांना लहानपणापासून बोधेंनी पाहिल्याने त्यांच्याबद्दल त्यांना आवड असल्याने त्यांच्या कादंबरीत त्यांचे चित्रण आले आहे.

बोधे यांच्या कादंबऱ्यांची शीर्षके ही आशयाला अनुरूप आहेत. शीर्षकावरून कादंबरीचा आशय स्पष्ट होते. त्यांच्या काही कादंबऱ्यांची शीर्षके जातिवाचक आहेत.

व. बा. बोधे यांच्या कादंबरीचा दर्जा सुमार असला तरी त्यांनी लेखनाचा प्रवास अखंड ठेवला. त्यांच्या कादंबरीला प्रसिद्धी नसली तरी त्यांना आज एक ग्रामीण कादंबरीकार म्हणून महाराष्ट्र ओळखतो. त्यांचा एक वेगळा वाचकवर्ग आहे. त्यांनी तो निर्माण केला तो त्यांच्या प्रतिभेमुळे. हे नाकारून चालणार नाही.

बोधे यांच्या सर्वच कादंबरींचा उल्लेख करता आला नाही. परंतु काही उल्लेखनीय कादंबरींचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून राहिलेल्या कादंबऱ्यांचा नामोल्लेख बोधे यांचे वाङ्मयीन संपदा यात केला आहे.

## २.५ आत्मकथन :

व. बा. बोधे यांनी कथा, कादंबरी लेखन केले असले तरी कथा कादंबरीबरोबर त्यांनी आत्मकथन हा वाङ्‌मयप्रकारही हाताळला आहे. त्यांनी एकूण दोन आत्मकथने लिहिली. त्यांतील 'कोकरउड्या' हे आत्मकथन हे विशेषत: ग्रामीण आत्मकथनातील एक वेगळ्या प्रकारचे आत्मकथन आहे. या आत्मकथनास १९९४ साली शांतीलाल बोरा ट्रस्ट, कोपरगाव यांचा ग्रामीण साहित्याचा पुरस्कार, सांगलीचा वसंतदादा साहित्यरत्न पुरस्कार १९९४ असे सन्मान मिळाले. त्याशिवाय 'कोकरउड्या' या आत्मकथनावरती डॉ. आनंद यादव, प्रकाश इनामतदार, प्रा. शंकरानंद येडगे, प्रा.शंकर सारडा, डॉ. सुधाकर भोसले, रवींद्र कोल्हे, प्रा. रोहीदास बोबडे या सर्वच समीक्षकांनी 'कोकरउड्या'वरती समीक्षा करून आपली मते मांडली आहेत.

'कोकरउड्या' या आत्मकथनात बोधे यांनी त्यांच्या जन्मापासून ते महाविद्यालयीन जीवनाचा संपूर्ण पट मांडला आहे. त्यामध्ये त्यांनी स्वत:कडे पाहत असताना गुणांचा गौरव केला नाही किंवा 'मी' ला प्राधान्य दिले नाही. सुख-दु:खाच्या काळात भावनांचा उद्रेक नाही, किंवा वेदनाचा हुंकार नाही. निरागसतेच्या वळणाने मनाची स्पंदने, वास्तव जीवनातील अनुभवांनी कोकरउड्याचे लेखन झाले आहे.

प्रस्तुत 'कोकरउड्या' या आत्मकथनाचा आवाका जवळजवळ सत्तावीस वर्षांचा असून त्या सत्तावीस वर्षांत लेखकाने खूप भोगले आहे. त्याचे चित्रण त्यांनी प्रस्तुत आत्मकथनात केले आहे. एके ठिकाणी व. बा. बोधे स्वत: म्हणतात, "खूप भोगलं, उपेक्षा पचविली. तक्रारीचा सूर कधी लावला नाही. दारिद्र्यात उगवलेल्या गावरान मस्तीत जगत राहिलो. एखादं कोकरू ऊब झेलत कोकरउड्या मारत राहतं आणि उंच कड्याच्या कपारीवर हिरवळीच्या निमित्तानं मिळालेल्या जागेवर तटून उभं राहतं, तसचं माझं जगण ! जगण्यात असूससलेपण आहे. पण जीवघेणी आसक्ती नाही."[२२] बोधे यांचे हे निवेदन कोकरउड्यातून प्रत्ययाला येते. अत्यंत गरिबीतून त्यांनी शिक्षण घेतले, संघर्ष करून सर्व मिळवले. प्रत्येक प्रसंगातून त्यांनी मार्ग काढला. तक्रारीचा सूर काढला नाही. एखाद्या कोकरासारखे जगले. कोकरू जसे बोरीबाभळीचा मिळेल तो चारा खावून जगते त्याचप्रमाणे बोधे जीवन जगले. तेच त्यांनी प्रांजळपणे कोकरउड्यातून मांडले आहे.

'कोकरउड्या' या आत्मकथनांची भाषाही ग्रामीण सातारी बोलीभाषा आहे. बोधे यांनी ग्रामीण भागाचे चित्रण परिणामकारकपणे मांडले आहे. आपले अनुभव अगदी प्रामाणिक व प्रांजळपणे

मांडले आहेत. या आत्मकथेत ग्रामीण भागातील कृषी संस्कृतीचे चित्रण केले आहे. खेड्यातील लोकांचे जीवन त्यांची जीवन जगताना होणारी परवड, ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे जसे चित्रण येते तसेच ग्रामदेवतांवरती असणारी श्रद्धा, त्यांच्या होणाऱ्या जत्रा, जत्रेतील तमाशा यांचे अगदी साध्यासोप्या भाषेत, विविध प्रसंगांतून मांडणी केली आहे.

कोकरउड्यातून ग्रामीण भागातील खेळांचे, रूढी-परंपरांचे, शेतीमध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांचे, त्याचबरोबर जनावरांचे व त्यावरती नितांत प्रेम करणाऱ्या माणसांचे चित्रण कोकरउड्यातून केले आहे. कोकरउड्याच्या नायकाचे बालपण खेड्यात गेल्याने आत्मकथनाची भाषाशैली गावरान बोली आहे. त्यात ग्रामीण शब्दांचा, म्हणींचा, उपमांचा त्याचबरोबर लोक गीतांचा समावेश केला असल्याने आत्मकथनास वेगळेपण लाभले आहे. म्हणूनच इतर आत्मकथनापेक्षा एक वेगळे आत्मकथन म्हणून कोकरउड्याचा उल्लेख करता येईल.

व. बा. बोधे यांचे दुसरे आत्मकथन म्हणजे 'रानपालखी' होय. कोकरउड्यातून बोधे यांनी जन्मापासून ते प्राध्यापक होईपर्यंतचा सर्व पूर्वार्ध मांडला आहे. तर रानपालखीतून त्यांनी २६ जुलै १९७६ रोजी सोमेश्वरच्या मुसा काकडे या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून हजर झाल्यापासूनचा पंचवीस वर्षांचा कालावधी मांडला आहे.

व. बा. बोधे यांचे 'रानपालखी' हे आत्मकथन जानेवारी २००३ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यामध्ये बोधे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार पहावयास मिळतो. रानपालखी या आत्मकथनात बोधे यांना प्राध्यापक म्हणून काम करीत असताना आलेल्या विविध अनुभवांचे चित्रण त्यांनी केले आहे. या आत्मकथनाची भाषा ही नागर बोलीभाषा आहे. डॉ. यशवंत पाटणे, डॉ. सुधाकर भोसले, अनिल बळेल, अ. वि. साठे यांनी या आत्मकथनावरती समीक्षा केल्या आहेत.

एकूणच व. बा. बोधे यांनी आत्मकथनामधून स्वत:चा वेगळा ठसा उमटवलेला आहे. ग्रामीण आत्मकथनकारात व. बा. बोधे यांचे नाव स्वतंत्रपणे घ्यावे एवढे वेगळेपण त्यांनी आपल्या आत्मकथनातून दाखवले आहे.

## २.६ ललितगद्य :

व. बा. बोधे यांनी कथा, कादंबरी, आत्मकथन त्याचबरोबर विशेषत: ललितगद्य स्वरूपाचेही लेखन केले आहे. यामध्ये 'चंदनबटवा' हे ललितगद्य १९९९ ला प्रकाशित झाले.

'चंदनबटवा' या ललितगद्यात बोधे यांनी स्वत:च्या आईचे चित्रण केले आहे. चंदनबटवा हे एका भाजीचे नाव आहे. शेतात कुठेही उगवणारी भाजी वर्षभर मिळणारी ही भाजी. या भाजीच्या हिरव्यागार पानावरती गुलालाची उधळण केल्यासारखी गुलाबी रंगाची छटा असते. या भाजीचा लेखकाच्या घरी कालवणासाठी उपयोग केला जात. घरामध्ये कालवणाची ओरड असली की लेखकाची आई मुलांना चंदनबटवा शिजवून घालत असे.

व. बा. बोधे यांच्या चंदनबटवा या ललितगद्याच्या संदर्भात शंकर सारडा म्हणतात, ''बोधे यांनी आपल्या आईच्या कर्तृत्वाचं आणि व्यक्तिमत्त्वाचं नेमकं, नेटक स्मृतिशिल्प उभारून तिला शब्दरूपी श्रद्धांजली वाहिली आहे. 'चंदनबटवा' ही एक कुठेही उगवणारी, वर्षभर मिळणारी बोधे यांची आवडती भाजी हिरव्यागार रोपांवर गुलाल शिंपडल्यासारखे गुलाबी डाग, निळी-पिवळी झाक ही परमेश्वराची हिरवी कारागिरी. आपल्या आईचे प्रतीक म्हणून चंदनबटव्याचा उल्लेख बोधे करतात. म्हणून त्यांनी या पुस्तकालाही तेच नाव दिले.''[२३]

शंकर सारडा यांच्या मताचा विचार करता बोधे यांनी आपल्या आईच्या कर्तृत्वाचं व व्यक्तिमत्त्वाचं स्मृतिशिल्प अगदी नेमकेपणाने व नेटकेपणाने चंदनबटव्यातून मांडले आहे. चंदनबटवा जसा कोणत्याही ठिकाणी उगवतो. त्याचप्रमाणे बोधेंची आई कोणत्याही प्रसंगात उभी राहते. म्हणून आपल्या आईचं प्रतीक म्हणून चंदनबटव्याचा उल्लेख बोधेंनी केला आहे.

चंदनबटवा या ललितगद्याच्या भाषेसंदर्भात शंकर सारडा म्हणतात, ''अस्सल गावरान भाषेचा झिणझिणाट पानोपानी दिसतो. या आईच्या चित्रणात प्रत्येक वाचकाला कुठेतरी आपल्याही आईचं रूप दिसेल आणि अंत:करणात कालवाकालव होईल.''[२३] शंकर सारडा यांचे वरील उद्‌गार सार्थ आहेत. कारण चंदनबटव्याची भाषा ही ग्रामीण व गावरान आहे. त्यातील आईचे चित्रण पाहून वाचकाला स्वत:च्या आईचे रूप आठवताना राहत नाही. वाचकाला चंदनबटवा वाचताना मातृप्रेमाने अंत:करणात कालवाकालव होतेच.

बोधे यांच्या चंदनबटवा या ललितगद्याच्या संदर्भात एके ठिकाणी वसंत केशव पाटील म्हणतात, ''चंदनबटवा हा त्यांच्या आत्मकहाणीचा अतीव भावकोमल व विव्हळ करणारा हळवा स्वर आईविषयीच्या आत्मविभोर, हृदयस्पर्शी व विपूलवर्णी आठवणींची स्मरणसाखळी आपल्या काळजाच्या कळीतील अवघे रंग-बंध, स्पर्श-स्पंदने आणि वेदना संवेदनांची भावांबरे जागवत मोठ्या उत्कटेने सजवली आहे.''[२४] वसंत केशव पाटील यांच्या वरील मताचा प्रत्यय चंदनबटव्याच्या

पानापानांतून येतो. त्यांनी स्वत:ची कहाणीच चंदनबटव्यातून मांडली आहे. त्यांच्या आईच्या आठवणींची त्यांनी जणू स्मरणसाखळी चंदनबटव्यातून मांडली आहे. चंदनबटव्यात त्यांची आई ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. चंदनबटवा या मातृछायेत वात्सल्य नि शब्दांच्या आगीचा डंका, त्याचबरोबर संयम, सोशिकता, संकट, संघर्षाच्या वाऱ्यावादळांत वाघीणीचे रूप धारणं करून हातामध्ये नागिणीगत वळवळणारे खुपरे घेऊन काळ्या मातीशी झोंबणारे, झटणारे, झटकणारे, झुंजार कामसू मन आपल्या घरादाराचे, गावशिवाराचे, मुला-बाळांचे, शेरडा-करडांचे भान व ध्यान जशी लेकरांवर तशीच कोकरांवर त्याचबरोबर प्राण्यापाखरांवर प्रेम करणारी, भावभावकिशी भावबंध तोडून रानमातीशी सलगी करणारी, कुंकवाच्या धन्याबरोबर गुरा-पोरांसाठी दावा मांडणारी, करणी-किटाळ, सणसुदिन, जत्राखेत्रा या साऱ्यात समरस होणारी, गाजावाजा करणारी अशी कितीतरी मातृरूपे बोधे यांनी रंगून चितारली आहेत.

चंदनबटव्यातून बोधे यांनी आपल्या आईचे चित्रण प्रभावीपणे केल्याने एके ठिकाणी वसंत केशव पाटील म्हणतात, ''ही मातृकथा कुणाही लेकराला आपली वाटावी अशी आहे.''[२५] कारण बोधे यांनी आपल्या आईचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. त्यामुळे ते वाचकांना आपल्या आईची कहाणी आहे असे वाटते.

'चंदनबटवा' या पुस्तकाबद्दल एका पत्रात डॉ. द. ता. भोसले म्हणतात, ''एका वसंत बोधे यांच्या आईची कथा राहिली ती एका ग्रामीण स्त्रीची सर्व आघाड्यांवर लढणाऱ्या योद्धा स्त्रीची प्रातिनिधिक कहाणी बनली आहे.''[२६] डॉ. द. ता. भोसले यांनी चंदनबटवा यातील आईच्या व्यक्तिरेखेविषयी मांडलेले मन योग्य आहे.

तर चंदनबटवा या कलाकृतीबाबत डॉ. यशवंत पाटणे म्हणतात, ''चंदनबटवा ही कलाकृती म्हणजे बोधेंची मनस्वी कारागिरी आहे. खेड्यापाड्यांत काबाडकष्ट करण्यात ज्यांचं जीवन गेले, दारिद्र्यातही ज्यांनी आपली जिद्द नि स्वाभिमान सोडला नाही, फाटका-गळका संसार सांभाळताना लेकराच्या शिक्षणाची काळजी घेतली आणि बापाच्या माघारी पोरांच्या मनावर हिमतीने जगण्याचा संस्कार केला. अशा वत्सल आईचं न्यार रूप बोधे चितारतात.''[२७] पाटणे यांचे मत यथायोग्य आहे. बोधे यांनी स्वत:च्या आईचे कष्ट, तिचा स्वाभिमान, तिच्यात असणारी जिद्द, तिने मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेली काळजी, मुलांवरती केलेले संस्कार, बापाच्या माघारी फाटका संसार सावरताना तिची झालेली अवस्था याचे चित्रण बोधे यांनी योग्यरीत्या घडविले आहे. म्हणून डॉ. यशवंत पाटणे

म्हणतात, ''गावरान मातीचा गंध घेऊन आलेली चंदनबटवा कलाकृती मराठी साहित्यशिवारात आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे उठून दिसते.''[२८]

ग्रामीण भागातील सणवार, यात्रा-जत्रांचा, प्राणी-पिके, शेतीत वापरली जाणारी हत्यारे यांचे चित्रण बोधे यांनी केले. त्यामुळे त्यातील प्रसंगांना उठावदारपणा आला आहे.

व. बा. बोधे यांचे 'फुलचुखी' ललितलेख संग्रह मार्च २००३ ला प्रसिद्ध झाला. या पुस्तकात एकोणीस लेखांचा समावेश केला आहे. जागा आनंदाच्या, रानमेवा, गाड्या वऱ्हाडाच्या, रानातील वस्ती, भुडकी, राजाची प्रजा, असे सण, असे उत्सव, घर, माझी शाळा, मछलीच्या शोधात, पाड आणि चुकार, खेळ गावाकडचे, झिंग नाटकाची, यात्रा ब्रह्मपुरीची, ग्रामदैवत, भजनी मंडळ, रानभैरी, माझे भेटलेले शिक्षक, माझी भावंड इ. लेखांचा समावेश केला आहे.

'फुलचुखी' म्हणजे लहानसे नखाएवढे रंगीबेरंगी फुलपाखरू होय. हे फुलपाखरू जसे प्रत्येक ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक फुलावरती जाऊन आनंदाने मनमुराद मध प्राशन करते, निसर्गाचा आनंद मनमुराद लुटते. तसेच बोधे बालपणीचे जीवन जगले. ते स्वत: म्हणतात, ''माझं बालमन असच 'फुलचुखीसारख' होतं. मी मनासारखं भिरभिरलो, निसर्गाच्या कुशीत वावरलो, रेंगाळलो. चार भिंतींच्या शाळेपेक्षा ही बिनभिंतीची शाळा मला आवडायची. निसर्ग मला जवळचा वाटायचा.''[२९] फुलचुखी या पुस्तकातून बोधे यांनी बालपणीच्या सर्व आठवणी चित्रित केलेल्या आहेत. बालपणीचे अनुभव चित्रित करताना बोधे यांनी जी रानात भटकंती केली त्याचे चित्रण या फुलचुखीत केले आहे.

'फुलचुखी' मध्ये बोधे यांनी ग्रामीण भागातील सर्व खेळांचे प्रकार 'खेळ गावाकडचे' या लेखातून टिपले आहेत. सणावारांचे चित्रण त्यांनी 'असे सण असे उत्सव' या लेखात ग्रामीण भागात साजरे केल्या जाणाऱ्या सणावारांचे चित्रण केले आहे. गावातील ग्रामदैवतांची चित्रणे 'ग्रामदैवत' या लेखात केले आहे. भजनी मंडळाचे चित्रणही बोधे यांनी फुलचुखीमध्ये केले आहे. लेखकाला बालवयात आवडलेल्या सर्व जागांचे वर्णन लेखकाने 'जागा आनंदाच्या' या लेखात केले आहे. आपल्या घराचे चित्रणही 'घर' या लेखात केले आहे. बालवयात लेखकाला नाटकाचे वेड लागले त्याचे चित्रण 'झिंग नाटकाची' या लेखातून टिपण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

व. बा. बोधे यांना लहानपणापासूनच भटकंती करण्याचे वेड असल्याने रानात आंब्याच्या सिझनला आंब्याच्या चुकलेल्या कैऱ्या शोधण्यासाठी लेखक प्रत्येक झाडावरती चढत असे. त्या आठवणींचे चित्रण 'पाड आणि चुकार' या लेखात आले आहे. मासे, खेडके पकडणे हे तर व. बा.

बोधे यांचे आवडते छंद. त्यासाठी लेखकाने सर्व ओढे धुंडले. त्यावेळचे अनुभव त्यांनी 'मछलीच्या शोधात' यातून चित्रित केलेले आहेत.

शाळकरी वयात आलेले सर्व अनुभव व त्यांना शाळेबद्दल वाटणारी आपुलकी, त्यांनी 'माझी शाळा' या लेखातून मांडले आहे. बोधेंना लाभलेले शिक्षक, त्यांनी त्यांच्या बालमनाकरती घडविलेले संस्कार याचे चित्रण 'माझे भेटलेले शिक्षक' यातून चित्रित होतात. बोधे यांना रानातील रानमेवा खाण्यात आनंद वाटते. रानात भेटणारी सिझनवार फळे याचे चित्रण 'रानमेवा' यातून केले आहे. लेखक गावातील सर्वच कार्यांत सहभाग घेत असे. लग्नकार्यातसुद्धा त्यांची हजेरी असायची. त्यावेळी त्यांना आलेले अनुभव त्यांनी 'गाड्या वऱ्हाडाच्या' या लेखातून चित्रित केले आहेत.

व. बा. बोधे यांनी आपल्या भावंडांचे चित्रण 'माझी भावंडे' या ललितलेखात केले आहे. असे हे 'फुलचुखी' हे ललितगद्य आहे. 'फुलचुखी' म्हणजे फुलामधल्या मधाचे शोषण करणारे नखाएवढे फुलपाखरू. स्वतःच्या रंगीबेरंगी अस्तित्वाने माणसाच्या मनाला मोहित करणारा निसर्गाचा हा अविष्कार! प्रा. बोधे यांनी केवळ ललितगद्यच लिहिलेले नसून फुलचुखी म्हणजे काव्यमय शैलीत केलेले निसर्गाचे वर्णन म्हणावे लागेल. या ललितगद्यातील निसर्ग हा उपरा नसून तो लेखकाच्या जगण्याशी एकरूप झालेला आहे. चाळीस वर्षांपूर्वीच्या सामाजिक वास्तवाचा हा बोलका आलेख म्हणावा लागेल. इथे सण आहेत, उत्सव आहेत. यात्राखेत्रा आहेत. त्याचबरोबर वऱ्हाडाच्या गाड्या आहेत. ग्रामीण मनाला गुंतवून ठेवणारे रान आहे. अशाप्रकारे फुलचुखीचे स्वागत झाले.

'वैखरीचा वारकरी' या ललित लेखसंग्रहात व्याख्यानाच्या निमित्ताने कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड, पाटण, चिपळूण, संगमेश्वर, खेड, पुणे, सोलापूर, उस्मानाबाद, तुळजापूर, चोपडा, जळगाव अशा शेकडो गावांत खेड्यापाड्यांत वाड्यावस्तींवरती आलेले कडूगोड अनुभवांचे चित्रण 'वैखरीचा वारकरी' मध्ये केले आहे. वैखरी म्हणजे वाणी होय. स्वत: बोधे म्हणतात, ''वैखरीवर प्रेम करणाऱ्यांना हे अनुभवाचे बोल मार्गदर्शक ठरतील. सत्त्वशील वृत्तीचा वारकरी गळ्यात माळ घालून, हाती टाळ घेऊन, खांद्यावर भागवत धर्माची पताका फडकवत ठेवून जन्मभर काळजात विठ्ठलाचा ध्यास बाळगतो. मी तरी दुसरं काय केलयं ? ओठातल्या निर्मळ वाणीवर मी मनापासून श्रद्धा ठेवली. कंठात शब्दांची माळ अखंडपणे फुलवत मी माझ्या श्रोत्यांच्यात पाहिला राबणाऱ्या, खपणाऱ्या मराठी माणसात मला पांडुरंग दिसता. म्हणूनच या ग्रंथाला नाव दिलं 'वैखरीचा वारकरी'.''[३०] बोधे यांनी मांडलेले मत वैखरीचा वारकरीचे स्वरूप पाहिल्यास योग्यच आहे असे वाटते.

व. बा .बोधे यांचे 'गावाकडची माणसं' हे लेखसंग्रह प्रसिद्ध झाले. बोधे यांनी या पुस्तकातून गावाकडील माणसांचे चित्रण केले आहे. 'वृक्ष माझे सोबती' हे व. बा. बोधे यांचे आणखी एक महत्त्वाचे ललितगद्य आहे. 'हसण्यासाठी जन्म आपुला', 'घराघरांचे रूप आगळे' ही दोन ललितगद्य लिहून त्यांनी ललित वाङ्मयात मोलाची भर घातलेली आहे.

## २.७ नाटक-नाटिका :

व. बा. बोधे म्हणजे एक अष्टपैलू साहित्यिक आहत. त्यांनी कथा-कादंबरी-ललित-आत्मकथन याबरोबरच नाटक या वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. महाविद्यालयीन जीवनात 'जळात राहून माशांची वैर' हे नाटक त्यांनी लिहिले आहे. त्याचबरोबर त्यांनी 'पास नावाचा देव', 'आम्ही भारतीय भगिनी' या दोन नाटिका लिहिल्या आहेत. 'आकाशझेप' नावाचे चरित्र बोधे यांनी लिहिले आहे. अशा प्रकारचे बोधे यांनी वाङ्मय निर्माण केले असून आजही बोधे यांचे लेखन चालू आहे. त्यात खंड नाही.

बोधे यांच्या एकूण साहित्याचा विचार करता त्यांचे सर्वच साहित्य हे ग्रामीण जीवनातील अनेक स्तर मांडले आहे. स्वत:ला आलेले अनुभव त्यांच्या साहित्याचा विषय बनवला आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे, गुरा-ढोरांचे, शेती-भातीचे, सणावारांचे, खेळांचे, देवदैवतांचे दर्शन वाचकांना घडते. ते स्वत: एके ठिकाणी म्हणतात, ''माझे थोडेफार ग्रामीण साहित्य म्हणजे माझा अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न नाही. स्वत्व जपण्याची लाडीवाळ धडपड आहे.''[३१] एकूणच बोधे यांच्या मनावरती लहानपणापासूनच ग्रामीण भागाचा ठसा उमटला. त्यामुळे त्यांच्या लेखनाचा विषय हा ग्रामीण परिसर झाला व त्याच ग्रामीण भागात त्यांची लेखणी रमली. म्हणून त्यांना एक ग्रामीण कादंबरीकार म्हणून महाराष्ट्र ओळखतो.

## २.८ प्रा. व. बा. बोधे यांची वाङ्मयीन संपदा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नाटक | : | 'जळात राहून माशांची वैर' |
| २. | नाटिका | : | 'पास नावाचा देव' |
| ३. | एकांकिका | : | 'आम्ही भारतीय भगिनी' |
| ४. | कथासंग्रह | : | १) फीस्ट, २) तकाटा, ३) जत्रा, ४) भटजीची मेक, ५) तिगाड, ६) हालगी, ७) बोराटी |

५. ललितगद्य : १) चंदनबटवा, २) वैखरीचा वारकरी, ३) फुलचुखी, ४) हसण्यासाठी जन्म आपुला, ५) घराघरांचे रूप आगळे, ६) वृक्ष माझे सोबती

६. आत्मकथन : 'कोकरउड्या' (१९९३), 'रानपालखी' (२००३)

७. चरित्र : आकाशझेप

८. शब्दचित्रे : गावाकडची माणसं

९. कादंबऱ्या : १) पाननिवळी, २) भैरोबाची लेकरं, ३) जंगल, ४) पस्तीस पायांची गोम, ५) कातण, ६) वाटणी, ७) फिरकूठ, ८) मवाली, ९) वाघीण, १०) घूस, ११) चावरतिडा, १२) बांडगूळ, १३) धामण, १४) चांगभलं, १५) नागीण, १६) लागीर, १७) बारा गावचं पाणी, १८) सातारी जर्दा, १९) डबल बदमाश, २०) ससाणा, २१) चमकी, २२) चिचुंद्री, २३) वाऱ्यावरचा पतंग, २४) इज्जत, २५) दलाल, २६) पिपाणी, २७) ढोलकं, २८) सामना, २९) छक्कड, ३०) खवीस, ३१) खुळखुळा, ३२) मुंगळा, ३३) भिंगरी, ३४) वेताळ, ३५) चकवा, ३६) सांगाडा, ३७) मुरळी, ३८) भुंगा, ३९) टिटवी, ४०) सोन्याचं घुंगरू गोफणीला, ४१) छप्पन्न टिकली, ४२) फरारी, ४३) तुणतुणं, ४४) रानमैना, ४५) विलायती मखमल, ४६) तरस, ४७) चिंगळी, ४८) बोका, ४९) मासोळी, ५०) सापळा, ५१) टक्कर, ५२) बदामराणी, ५३) गजरी, ५४) खळगा, ५५) सुगरण, ५६) रानचिमणी, ५७) घोणस, ५८) साती आसरा, ५९) बिजली, ६०) गुंडगी, ६१) शिकार, ६२) वयात आलेला नाग, ६३) पाकोळी, ६४) कोकरु, ६५) करडीचं बोंड, ६६) बदला, ६७) फिरकी, ६८) हिरवं सोनं, ६९) कुंकवाचा धनी, ७०) बुलबुल, ७१) झुंज, ७२) हिरवी गौळण, ७३) गुलाबी पेरू.

## २.९ समारोप :

'व. बा. बोधे : वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या प्रकरणात बोधे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या उपलब्ध साहित्य कलाकृतींचा विस्ताराने परिचय करून दिला आहे. परंतु प्रबंधाच्या मर्यादा लक्षात घेता इतर कलाकृतींचा नुसता नामोल्लेख केला आहे.

## २.१० निष्कर्ष :

१) व. बा. बोधे यांनी बालवयात आलेले अनुभव आपल्या साहित्यातून मांडले आहेत.

२) व. बा. बोधे यांच्या एकूणच साहित्याची भाषा ही ग्रामीण बोलीभाषा आहे.

३) बोधे यांच्या काही कादंबरीतून इरसाल ग्रामीण तरुण स्त्रीचे चित्रण आलेले आहे.

४) बोधे यांच्या काही कलाकृतीतून लोकपरंपरा व लोकगीतांचा यथायोग्य वापर केलेला दिसून येतो.

५) ग्रामीण भाषाशैलीबरोबर बोधे यांनी ग्रामीण भागातील म्हणींचा, उपमांचा, प्रतिकांचा निवेदनात उपयोग केल्याने निवेदनात परिणामकारकता आली आहे.

६) ग्रामीण परिसर, ग्रामीण भागात राहणारा कष्टकरी समाज, त्यांची जीवन जगताना होणारी ससेहोलपट या सर्व घटना प्रसंगांतून बोधे यांचे साहित्य आकार घेते.

७) भटका, दलित, उपेक्षित समाजाचे चित्रण बोधे यांनी साहित्यातून मांडले आहे.

८) साहित्यकृतींचा अभ्यास करताना व. बा. बोधे यांनी ग्रामीण भाषाशैलीचा वापर साहित्य-निर्मितीसाठी केला आहे.

९) प्रा. व. बा. बोधे यांनी आपल्या गावाला केंद्रबिंदू मानून साहित्यनिर्मिती केली आहे.

१०) ग्रामीण भागात खेळल्या जाणाऱ्या सर्व खेळांचे चित्रण बोधेंनी काही कलाकृतीतून केले आहे.

११) बोधे यांनी स्वत: दारिद्रयाचे चटक भोगल्याने त्यांच्या साहित्यातून दारिद्रयाचे चित्रण आलेले आहे.

१२) ग्रामीण भागातील कृषी संस्कृती, रूढी-परंपरा, उत्सव त्याचबरोबर शेती भातीत घेतल्या जाणाऱ्या पिकांचे व अवजारांचे चित्रणही बोधेंनी साहित्यात केले आहे. तसेच ग्रामीण समाजात राहणाऱ्या व्यक्तींचे स्वभाव, वृत्ती-प्रवृत्तींचे यथार्थ दर्शन त्यांच्या बहुतेक कलाकृतींमधून प्रत्ययास येते.

15912

## २.११ संदर्भ टिपा :


१. प्रा. बोधे व. बा. : 'मी व माझे साहित्य' म. सा. प. ग्रामीण साहित्य विशेषांक, पुणे १९८० जुलै - डिसेंबर १९८०, पृ. १९०

२. प्रा. बोधे. व. बा. : 'मी व माझे साहित्य', म. सा. प. ग्रामीण साहित्य विशेषांक पुणे १९८०, जुलै-डिसेंबर १९८०, अंक २१४, २१५, पृ. १९०-१९५

३. डॉ. भोसले द. ता. : नवभारत ऑक्टोबर १९७८

४. डॉ. भोसले द. ता. : नवभारत ऑक्टोबर १९७८

५. डॉ. कऱ्हाडे सदा : १९७७ मधील कथासंग्रह, ललित, मे १९७८

६. डॉ. यादव आनंद : 'फीस्ट' १९७७ चे मलपृष्ठ

७. प्रा. रांगणेकर प्रभा : 'फीस्ट' प्रस्तावना, पृ. ६

८. डॉ. यादव आनंद : दि. २२/४/७९ चे पत्र, परिशिष्ट क्र.९१

९. घारे दीपक : 'महाराष्ट टाईम्स', ८ ऑक्टोबर १९७८

१०. प्रा. जाधव विलास : 'एक हृदय कथोपकथा : फीस्ट', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, डिसेंबर १९७८

११. प्रा. जाधव विलास : 'एक हृदय कथोपकथा : फीस्ट', तत्रैव

१२. डॉ. पाटणे यशवंत : 'रानपालवी : भावरम्य शैलीत साकारलेली अक्षरयात्रा' शोधनिबंध, दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३

१३. पवार दया : १७ ऑक्टोबर १९७८ चे पत्र.

१४. बोधे व. बा. : 'हिरवं सोनं', शांती प्रकाशन, पुणे, १९९३, प्रथम आवृत्ती, पृ. कादंबरीचे मलपृष्ठ

१५. डॉ. ठाकूर रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी' (१९८० ते १९९०) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३, पृ. १४०

१६. डॉ. ठाकूर रवींद्र : तत्रैव, पृ. १४०

१७. डॉ. ठाकूर रवींद्र : तत्रैव, पृ. १४१

१८. डॉ. ठाकूर रवींद्र : तत्रैव, पृ. १४१

१९. कुलकर्णी अरविंद वामन : प्रा. व. बा. बोधे यांच्या कादंबऱ्या 'एक अनावृत पत्र', महाराष्ट्र साहित्य पत्रिका १९८१, पृ.३७

२०. कुलकर्णी अरविंद वामन : तत्रैव, पृ.४०, ४१

२१. सारडा शंकर : 'चंदनबटवा' प्रथमावृत्ती, १९९९ मलपृष्ठ

२२. सारडा शंकर : 'चंदनबटवा' तत्रैव

२३. पाटील वसंत केशव : 'साहित्यसूची' ऑगस्ट २०००

२४. पाटील वसंत केशव : तत्रैव

२५. डॉ. भोसले द. ता. : यांचे पत्र 'चंदनबटवा' १९९९, पृ. १३३

२६. डॉ. पाटणे यशवंत : 'ग्रंथ आमुचे साथी', शब्द प्रकाशन, प्रथमावृत्ती २००६, पृ. २९

२७. डॉ. पाटणे यशवंत : 'ग्रंथ आमुचे साथी', तत्रैव, पृ. ३०

२८. प्रा. बोधे व. बा. : फुलमुखीच्या निमित्ताने 'फुलमुखी', प्रथमावृत्ती, २००३, पृ. ६

२९. प्रा. बोधे. व. बा. : 'वैखरीचा वारकरी', अक्षरबंध प्रकाशन, प्रथमावृत्ती २००४, प्रस्तावना

३०. प्रा. बोधे व. बा. : 'मी आणि माझे साहित्य', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-डिसेंबर १९८९, ग्रामीण साहित्य विशेषांक, पृ. १९४


------x-----